# सीमोल्लंघन- आता सर्वजातीय वधू-वरांसाठी अनुरूप मासिक.

गेल्या साठ सत्तर वर्षात  आणि विशेषतः गेल्या पंचवीस वर्षांत रोजच्या व्यवहारातील जातीय बेड्या खूप मोठ्या प्रमाणावर तुटल्या. बस किंवा लोकल मध्ये शेजारी बसलेला मनुष्य कोणत्या जातीधर्माचा आहे याचा फारसा फरक पडेनासा झाला. शाळा-कॉलेजात विविध जातीधर्माची मुलं-मुली एकत्र असणारे गट बनणे आश्चर्याचे उरले नाही. हळूहळू तर ते अंगवळणी देखील पडले. जातीच्या भिंती काही बाबतीत पुरत्या ढासळल्या तर काही बाबतीत त्यांची जाडी कमी झाली. रोटीचे व्यवहार करताना जात हा मुद्दा आपण बाजूला ठेवू लागलो. पण बेटीच्या व्यवहारात आपण अजूनही बरेच मागे आहोत हे खरंय. पण तिथेही लवचिकता येऊ लागलीए.

“आपल्याच जातीतील जावई मिळाला तर बरं… माझ्या मुलीला घरातल्या रीतीभाती नव्याने शिकाव्या लागणार नाहीत.”, विद्याताई मला मुलीच्या लग्नाचा विषय चालू असताना सांगत होत्या. “आपल्याच जातीतील मुलगी मिळाली सून म्हणून तर जेवणाखाणाच्या पद्धती आधीपासूनच माहिती असतील. सोपं जाईल सगळ्यांना”, एका पालकांच्या गटचर्चेत श्यामराव म्हणाले होते. अशा असंख्य पालक-मुलांशी मी संवाद साधत असते. ‘आपल्याच’ जातीतील जोडीदार का हवा या माझ्या प्रश्नावर ‘घरातल्या रीतीभाती-सवयी’ यापलीकडे विशेष कोणी कारण देऊ शकत नाही असा माझा अनुभव आहे. ज्या घरांत “सगळं घरकाम मुलींनीच करावं. आणि दुसरं म्हणजे ते आमच्या घरातील रीतीनुसार करावं.” अशी मानसिकता आहे ती घरं मनाने अजून किमान तीस वर्ष काळाच्या मागे आहेत असं मानावं लागेल. तीसएक वर्षांपूर्वी बहुसंख्य समाज हा याच मानसिकतेचा होता. मुलींचीही घरात आईच्या तालमीत संसारासाठी तयारी करून घेतली जाई. पण आज २०१७ मध्येही ही परिस्थिती आहे काय? नसेल तर अजून आपण जुन्याच मानसिकतेमध्ये का बरं राहतो आहोत?

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत, आपल्या समाजात त्या आधीच्या पन्नास वर्षात झाले नव्हते एवढे बदल झाले आहेत. आणि त्यामुळेच १९९० च्या म्हणजे आर्थिक उदारीकरणाच्या आधीच्या मानसिकतेने कोणत्याही गोष्टीकडे आणि विशेषतः विवाहासारख्या गंभीर गोष्टीकडे बघणं, हे म्हणजे संसारात वेगवेगळ्या समस्यांना आमंत्रण देण्यासारखंच आहे. आत्ता जी मुलं-मुली लग्नाला उभी आहेत ती मोठी झाली आहेत तीच मुळी या गेल्या पंचवीस वर्षांच्या बदलाच्या कालखंडात. आणि याच काळात आपल्या सर्वांची जीवनशैली अमुलाग्र बदलली आहे. ही बदललेली जीवनशैली जातीशी नव्हे तर आर्थिक उत्पन्नाशी निगडीत आहे. शहरी

मध्यमवर्ग-उच्च मध्यमवर्ग हा कोणत्याही जातीचा असला तरी त्यांच्यात रोजच्या सवयींमध्ये फारसा फरक उरलेला नाही. मॅकडोनाल्ड मध्ये मराठ्यांना मिळणारा बर्गर आणि ब्राह्मणांना मिळणारा बर्गर वेगळा असत नाही! आवडीनिवडी, सवयी या जातीनिहाय न उरता शुद्ध सोय आणि रुची या आधारावर ठरत आहेत. अशा परिस्थितीत विवाहाच्या बाबतीत कोणताही मजबूत आधार नसताना आपण जातीच्या पडलेल्या भिंती पुन्हा उभारण्यासाठी का सरसावतो हे कळत नाही. मध्यंतरी एका मुलाच्या पालकांशी बोलत होते. मुलाने आयुष्यभर अमेरिकेत राहण्याचं ठरवलं होतं. तरीही त्याच्या पालकांना त्यांच्याच जातीची मुलगी सून म्हणून हवी आहे. वास्तविक अमेरिकेत राहणाऱ्या सर्वच मुला-मुलींचं आयुष्य किती एकसारखं आहे हे मला माहित आहे. जातीचाच काय पण धर्माचाही फारसा फरक तिकडे दैनंदिन आयुष्यात पडत नाही अशी परिस्थिती आहे. मग हा ‘स्वजातीय’ चा हट्ट आपण का बाळगून आहोत? आणि केवळ तथाकथित उच्च जातीचेच नव्हे तर इतरही जातीतील मंडळी हा हट्ट सोडायला तयार नसल्याचं चित्र आहे.

स्त्री-पुरुष समानता आणि एका आर्थिक वर्गातील सर्व लोकांच्या जीवनशैली व रीतींमध्ये आलेले साम्य यामुळे, ‘घर सांभाळण्याच्या पद्धती आणि रीतीभाती’ हा विषय खरंतर केव्हाच मागे पडायला हवा होता. नव्हे नव्हे, तो पडलाही आहे. म्हणूनच मला वाटतं, लग्नाच्या बाबतीत आपले जात विषयक दुराग्रह तपासून घेण्याची वेळ आता आली आहे. असे काही चमत्कारिक दुराग्रह आपण बाळगून असतो की तटस्थपणे बघणाऱ्याला हसूच यावं. “मला कोकणस्थ मुलगी बिलकुल नको. फार चिकट लोक असतात. गणपती सुद्धा दीड दिवसात आटोपतात”, सुश्रुत एकदा माझ्याशी बोलताना म्हणाला. “ब्राह्मण मुळीच नको. आमच्या घर म्हणजे सतत चिकन मटण खाणारं घर. मी सून म्हणून तिकडे गेली तर पार वाळून जाईन.”, सविता मला म्हणाली होती. काय गंमत आहे बघा. माझ्या ओळखीत कित्येक कोकणस्थांची घरं आहेत जिथे गणपती पाच काय दहा दिवस असतात. कित्येक देशस्थांची घरं माहित्येत जिथे दीड दिवसाचा गणपती असतो. अनेक मराठा मंडळी माहित्येत जे पूर्ण शाकाहारी आहेत. इतकंच काय तर ब्राह्मण घरं माहित्येत जिथे अगदी तिखट जेवण आवडीने खाल्लं जातं. जातीनुसार उगीच सरसकट सगळ्यांना एकाच तराजूत तोलण्याची पद्धत आपण बंद केली पाहिजे. आजकालच्या सरमिसळ झालेल्या जमान्यात प्रत्येक व्यक्ती वेगळी, प्रत्येक घर वेगळं. सरसकटपणे जात किंवा अन्य कोणतंही लेबल चिकटवून आपण लोकांना योग्य प्रकारे ओळखू शकू असं मला वाटत नाही.

आपल्या व्यक्तिगत आयुष्यात जातीच्या पद्धती आणि रीतींच्या पलीकडे आपण केव्हाच गेलो आहोत. पण तरीही सामाजिक आयुष्यात दुसऱ्याला त्याच्या जातीच्या ऐकीव गोष्टींवर आधारित जोखण्याची आपली सवय गेलेली नाही. या विरोधाभासाला आपण छेद दिला पाहिजे. समाजाकडे आणि व्यक्तींकडे

स्वतंत्रपणे आणि विशाल दृष्टीकोन ठेवून बघितलं पाहिजे. तसं झालं तर लग्नाच्या बाबतीत आपण अधिक मोकळे, अधिक प्रगल्भ आणि अधिक चांगला विचार करू शकू. बाकी सगळं आधुनिक, पण लग्नाच्या वा संसाराच्या बाबतीत मात्र पारंपारिक असा दुटप्पीपणा यापुढे पेलवणारा नाही. कोणी आव्हान म्हणून तसा प्रयत्न केलाच तरी त्यातून घरात कारण नसताना संघर्ष निर्माण होईल. कधी स्वतःशीच झगडा सुरु होईल. आपल्या आयुष्याची रणभूमी करायची की नंदनवन करायचं हा शेवटी ज्याच्या त्याच्या इछेचा प्रश्न. पण मला विचाराल तर, लग्न ठरवण्याच्या प्रक्रियेत विनाकारण जातीच्या सीमांचा अडसर निर्माण करून आपलेच जग संकुचित करण्यापेक्षा, सीमोल्लंघन करून; नीट समजून उमजून, नेमक्या आणि वास्तव डोळयासमोर ठेवून केलेल्या कारणमिमांसेवर आधारित असा निर्णय आपण घ्यायला हवा. त्या दिशेने आपण जितकं लवकर जाऊ तितकं लग्नव्यवस्था आणि एकूणच समाजव्यवस्थेला हितकारक.

हळूहळू का होईना, पण याबाबतीत गेल्या काही वर्षात सकारात्मक बदल घडू लागलेले आम्हाला दिसतायत. जातीबाबतचे मुला-मुलींचे आग्रह कमी होत आहेत आणि त्यांच्यामुळे त्यांचे पालकही तितकेसे कट्टर राहिलेले नाहीत. आंतरजातीय विवाह ही अगदी नाविन्याची गोष्ट राहिलेली नाही. आणि लग्न ठरवताना शिक्षण, सवयी, व्यक्तिगत मूल्यव्यवस्था, व्यक्तींचे स्वभाव या गोष्टींकडे जातीपेक्षाही बारकाईने बघितलं जातंय. या सामाजिक बदलांनाच अनुरूपने प्रतिसाद द्यायचं ठरवलंय. ऑगस्टच्या महिन्यापासून अनुरूपच्या मासिकात सर्वजातीय वधू-वरांची माहिती असणार आहे. सर्वजातीय मुलंमुली आणि पालक यांच्यासाठी अनुरूप मासिकाची सेवा सुरु केली जावी ही मागणी गेली अनेक वर्ष आपल्याकडे सातत्याने केली जात होती. ती मागणी पूर्ण करण्याच्या दिशेने आम्ही पाउल उचलतोय याचा अनुरूपला आनंद आहे.

- **गौरी कानिटकर**